डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ व संलग्न संस्थेतील सुधारीत वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या निवृत्तिवेतनधारक / कुटूंब निवृत्तिवेतनधारकांना दिनांक ०१ जुलै,२०१९ पासून महागाई भत्ता वाढ मंजूर करणेबाबत........

# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## अर्थप्रशासन विभाग

वाचा :वित्त विभाग शासन निर्णय :क्र.:निमवा-२०२०/प्र.क्र.१/सेवा-४, तारीख : ७ जानेवारी,२०२०.

## आदेश

जा.क्र./अप्रवि/निमवा/२०१९-२०/३०३९. दिनांक :१५/०१/२०२०.

शासनाने उपरोक्त शासन निर्णय दिनांक ७ जानेवारी,२०२० अन्वये ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतन संरचनेतील असणाऱ्या निवृत्तिवेतन धारक /कुटूंब निवृत्तिवेतनधारकानां मूळ निवृत्तीवेतन / कुटूंबनिवृत्तीवेतनाच्या एकूण रकमेवर दिनांक १ जुलै,२०१९ पासून अनुज्ञेय महागाई वाढीचा दर १२ टक्के वरुन १७ टक्के सुधारीत करण्यात आला आहे. शासन निर्णयाच्या अनुषंगाने विद्यापीठातील निवृत्तिवेतनधारक /कुटूंब निवृत्तिवेतनधारकानां दिनांक १ डिसेंबर २०१९ पासून उपरोक्त महागाई भत्त्याची वाढ रोखीने देण्यात यावी.

सदरहू महागाई भत्त्याची वाढ दिनांक १ जानेवारी, २०२० च्या नियमित निवृत्तीवेतन / कुटूंबनिवृत्तीवेतन देयकात अदा करावी. तसेच १ जुलै,२०१९ ते ३० नोव्हेंबर,२०१९ या ५ महिन्याच्या कालावधीतील महागाई वाढीच्या थकबाकीबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील. दिनांक १ जानेवारी,२०२० ची महागाई भत्त्याची देयके माहे जानेवारी,२०२० देय फेब्रुवारी,२०२० चे नियमित मासिक नियमित निवृत्तीवेतन / कुटूंबनिवृत्तीवेतन देयकात करावी किंवा त्यापुढील नियमित मासिक नियमित निवृत्तीवेतन / कुटूंबनिवृत्तीवेतन देयकात समावेश करावा मात्र याबाबत पुरवणी देयक सादर करु नये अशी पुरवणी देयक पारित केली जाणार नाहीत.

महागाई भत्ता वाढीच्या अनुषंगाने होणारा वाढीव खर्च हा सन २०१९-२० चे मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

भा.कृ.अ.प. योजनातंर्गत २०१९-२० करीता वेतन अनुदानाची मागणी करतांना संबंधीत कार्यान्वयन अधिकाऱ्यांनी प्रस्तुत महागाई भत्त्यात वाढ विचारात घेऊन त्यानुसार वेतन अनुदानाची मागणी करावी.

मा.कुलगुरु महोदय यांच्या मंजुरीने..

नियंत्रक
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला

**प्रतिः** १) नियंत्रण अधिकारी (सर्व)/आहरण व संवितरण अधिकारी(सर्व)/विभागप्रमुख (सर्व)

.....................................................................................

२) प्राचार्य, ........................................................................

३) वेतन व लेखाधिकारी, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला/नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

नियंत्रक

RMR Budget/DA/New